मुंबईत कोण जिंकलं? वाचा विजयी उमेदवारांची यादी >> पान 2

शरद पवारांची साथ सोडून काँग्रेसला हात, प्रशांत जगताप यांना पक्षांतराचा लाभ; पुण्यातून विजयी! >> पान 3

देवदूतच...! सावकारी जाचातून शेतकऱ्यांची सुटका >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



टोकियोमध्ये अल्लू अर्जुन जपानी भाषा बोलल्यानंतर चाहते झाले प्रभावित, पुष्पा २ होईल रिलीज... आतील पान

**सुविचार**

तुम्ही निर्भय व्हा, भीती बाळगाल तर तरणोपाय नाही.
– लोकमान्य टिळक

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 161 ■ शनिवार, दि. 17 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीचा डंका !

## भाजप-शिंदेसेना सुसाट, ठाकरे बंधूंची पीछेहाट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांपैकी सर्वाधिक चर्चेत असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप-शिंदेसेनेने जोरदार मुसंडी मारली. तब्बल २० वर्षानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले होते. पण त्यांना या निवडणुकीत अपेक्षित यश मिळवता आलेले नाही. मुंबईत भाजप-शिंदेसेना विरूद्ध ठाकरे बंधू अशी थेट लढत होती. ठाकरे बंधूंनी मराठी माणूस हा मुद्दा प्रचारात वापरला, तर भाजप-शिंदेसेनेने विकास या मुद्द्यावर प्रचार सुरु ठेवला. या प्रचारात भाजप-शिंदेसेनेच्या विकासाने बाजी मारली. दुपारी १ वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार, भाजप ९२ जागांवर, शिंदेसेना २६ जागांवर आघाडीवर आहे. तर दुसरीकडे उद्धवसेना ६० तर राज ठाकरेंची मनसे केवळ ९ जागांवर आघाडीवर आहे. मुंबई महानगरपालिका निकालाचे सर्व अपडेट्स इथे पहा ड्ळींश.



ठाकरे बंधू एकत्र, पण विजयाची हुलकावणी

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या आणि प्रतिष्ठेच्या ठरलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत अखेर भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने जोरदार मुसंडी मारली. गेल्या दोन दशकांपासून मुंबईवर असलेल्या ठाकरे कुटुंबाच्या वर्चस्वाला या निवडणुकीत मोठा धक्का बसला. विकासाच्या मुद्द्याने 'मराठी कार्ड'वर मात केल्याचे चित्र दिसून आले. या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तब्बल २० वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्र मैदानात उतरले होते. मुंबईत 'मराठी माणूस' आणि 'मुंबईची अस्मिता' हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून ठाकरे बंधूंनी भावनिक साद घातली होती. मात्र, मुंबईकरांनी या भावनिक आवाहनापेक्षा महायुतीच्या 'विकास' अजेंड्याला अधिक पसंती दिली.

भाजप आणि शिंदेसेनेने प्रचारात केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मुंबईत सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांवर भर दिला होता. मेट्रोचे जाळे, कोस्टल रोड आणि ट्रान्स हार्बर लिंक यांसारख्या मोठ्या प्रकल्पांच्या जोरावर महायुतीने मतदारांना साद घातली. दुसरीकडे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संयुक्त ताकदीसमोर भाजपने लावलेली तगडी फिल्डिंग यशस्वी ठरली आहे. या निकालामुळे मुंबई महानगरपालिकेतील सत्तेची समीकरणे आता पूर्णपणे बदलणार असून, मुंबईत आता पहिल्यांदा भाजपचा महापौर बसणार आहे, हे निश्चित झाले आहे.

मुंबईतील मराठी पट्ट्यात ठाकरे बंधूंना आपली ताकद दाखवण्याची संधी होती. पण त्यांना त्यापद्धतीची कमाल करता आली नाही. जाणून घ्या, मुंबईतून कोणत्या वॉर्डातून कोण विजयी झाले, पाहूया.

>> पान २

## कल्याण-डोंबिवलीमध्ये फॅमिली ड्रामा, एकाच कुटुंबातील तिघं ३ पक्षांकडून विजयी!

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेना महायुतीने दणका उडवून दिला आहे. डोंबिवलीमध्ये तर एकाच कुटुंबातील तिघे उमेदवार वेगवेगळ्या पक्षांच्या तिकीटावर निवडणूक लढत होते, या तिघांनाही विजय मिळाला आहे. डोंबिवलीमधल्या पॅनल २१ मधून म्हात्रे कुटुंबातील तिघांचा विजय झाला आहे.

पॅनल २१ अ मधून मनसेचे प्रल्हाद म्हात्रे, २१ ब मधून भाजपच्या डॉ. रविना राहुल म्हात्रे आणि २१ क मधून शिवसेना शिंदे गटाच्या रेखा म्हात्रे विजयी झाल्या आहेत. हे तिघेही एकाच कुटुंबातील असूनही वेगवेगळ्या पक्षातून निवडणूक लढले होते. म्हात्रे कुटुंबामध्ये प्रल्हाद म्हात्रे हे दीर, रेखा म्हात्रे या भावजय आणि रविना म्हात्रे या सूनबाई आहेत. आता हे तिघेही वेगवेगळ्या पक्षाच्या नगरसेवक म्हणून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये बसणार आहेत.

कल्याण-डोंबिवलीमध्ये शिवसेना सध्या १२ जागांवर विजयी झाली आहे, तर ६ जण बिनविरोध निवडून आले असून ४० जागांवर शिवसेना आघाडीवर आहे. तर भाजपचा आतापर्यंत ८ जागांवर विजय झाला असून त्यांचे बिनविरोध १६ उमेदवार निवडून आले आहेत. २२ जागांवर भाजप उमेदवार आघाडीवर आहेत. मनसेचे २ उमेदवार जिंकले असून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे २ उमेदवार विजयी झाले आहेत.

दुसरीकडे कल्याण-डोंबिवलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवारांच्या पक्षाला अजून एकाही जागेवर आघाडी मिळालेली नाही. कल्याण-डोंबिवलीमध्ये भाजपचे १५ आणि शिवसेनेचे ७ नगरसेवक हे आधीच बिनविरोध निवडून आले होते, त्यामुळे पहिलं मत पडण्याच्या आधीच महायुती २२ जागांनी आघाडीवर होती.

## भाजपाचे प्रवक्ते, माजी पत्रकार नवनाथ बन मुंबईतून विजयी; पहिल्यांदाच निवडणूक लढवत मारली बाजी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी पत्रकार आणि भाजपाचे माध्यम विभागाचे प्रभारी आणि प्रवक्ते नवनाथ बन यांना मुंबईच्या वॉर्ड क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली होती. पहिल्यांदाच निवडणूक लढवत असलेल्या नवनाथ बन यांना या वॉर्डातून यश मिळाले असून त्यांचा विजय झाला आहे. भाजपाकडून यंदाच्या निवडणुकीत अनेक युवा चेहऱ्यांना संधी देण्यात आली होती. त्यापैकी नवनाथ बन एक होते.

नवनाथ बन ८५७८ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांनी शिवसेनेच्या (ठाकरे) समीक्षा सक्रे यांचा पराभव केला आहे.

नवनाथ बन यांच्या प्रचारासाठी अनेक नेत्यांनी वॉर्डात हजेरी लावली होती. भोजपुरी अभिनेते, भाजपा माजी खासदार मनोज तिवारी यांनी वॉर्डात प्रचार केला होता. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनीही प्रचारात सहभाग घेतला होता.

प्रचारादरम्यान वॉर्डातील वातावरण तापलेले पाहायला मिळाले होते.

## २९ पैकी २५ महापालिकेत भाजपाला घवघवीत यश; निकालानंतर भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीतील विजयाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज महाराष्ट्र प्रदेश भाजपा कार्यालयात आले होते. यावेळी ढोल-ताशे, फटाके आणि घोषणांच्या गजरात त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजपा नेत्या पंकजा मुंडे, मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते आणि कार्यकर्ते या जल्लोषात सहभागी झाले होते. कार्यालय परिसरात उत्सवाचं वातावरण होतं.

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना फडणवीस म्हणाले, ''महाराष्ट्र भाजपाला मिळालेला हा विजय कौतुकास्पद आहे. जनतेनं दिलेल्या कौलाबद्दल मी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानतो. मुंबईत महायुतीला बहुमत मिळणार असून, राज्यातील २९ पैकी २५ महापालिकांमध्ये भाजपाची सत्ता येईल हे यश विक्रमी आहे.''

जनतेने विकासाला मतदान केलं आहे. दिवंगत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी होता, याचं स्मरण मी यावेळी करतो. व्यापक हिंदुत्ववादी जनमत आम्हाला लाभलं आहे. मात्र विजय मिळाल्यानंतर उन्माद नको,'' असा सल्लाही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. त्याचबरोबर मुंबईत महायुतीत सामील असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनाही फोन करून शुभेच्छा दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. महापौर बसल्यानंतर पुन्हा जल्लोष करणार असल्याचं ते म्हणाले.

## जळगावमध्ये ठाकरे गटाला मोठा झटका, एकनाथ शिंदेंच्या उमेदवारांनी बाजी मारली

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव महापालिकेच्या निवडणुकीचा पहिला निकाल हाती आला होता.या निकालात प्रभाग क्रमांक १९ मधून भाजपचे राजेंद्र घुगे पाटील विजयी ठरले होते. त्यानंतर आता जळगावमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. कारण जळगावच्या प्रभाग क्रमांक १८ मधून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ठाकरे गटाच्या उमेदवारांना धुळ चारली आहे. जळगाव महापालिका निवडणुकीत महायुती आघाडीवर आहे. प्रभाग प्रभाग क्रमांक १८ मध्ये शिंदे सेनेने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे. शिवसेनेचे १८ ब मधील उमेदवार सोनवणे नलुबाई तुळशीदास यांनी ठाकरे गटाच्या तापीबाई रंजीत राठोड यांना चित पट केले आहे. तर १८ क मधून शिवसेनेच्या अनिता सुरेश भापसे यांनी ठाकरे गटाच्या सोनम रोहिदास सोनवणे यांना चित पट केले आहे. शिंदे सेनेचे यापूर्वीच १८ अ मधून गौरव चंद्रकांत सोनवणे बिनविरोध विजयी झालेले आहेत. त्यातच आता प्रभाग क्रमांक १८ मधून शिवसेनेचे दोन उमेदवार विजयी झाले आहे.

## २०२५ आतापर्यंतच्या इतिहासातील तिसरं सर्वात उष्ण वर्ष, दीर्घकालीन तापमानवाढ कायम – नासाचा अहवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** २०२५ हे रेकॉर्डवरील तिसरं सर्वात उष्ण वर्ष ठरलंय. हे वर्ष २०२३ पेक्षा केवळ ०.०१ष्ट थंड तर २०२४ (सर्वात उष्ण वर्ष) पेक्षा ०.१३ष्ट थंड राहिलं. गेली ११ वर्षे ही रेकॉर्डवरील सर्वात उष्ण वर्षे आहेत. २०२५ या तीन वर्षांचे जागतिक सरासरी तापमान प्री-इंडस्ट्रियल काळाच्या (१८५०-१९००) तुलनेत १.५ष्ट पेक्षा जास्त होती. ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा सलग तीन वर्षांच्या कालावधीनं १.५ष्ट मर्यादा ओलांडली. जागतिक जमिनीवरील हवेचं तापमान दुसरं सर्वात उष्ण, अंटार्क्टिकाचं रेकॉर्डवरील सर्वात उष्ण तर आर्क्टिकाचं दुसरं सर्वात उष्ण नोंदवलं गेलं.

तिसरं सर्वात उष्ण वर्ष

नासाच्या नव्या विषणानुसार, २०२५ हे वर्ष जागतिक पृष्ठभाग तापमानाच्या बाबतीत २०२३ इतकंच उष्ण ठरलं आहे. वर्षभराची सरासरी तापमानवाढ २०२३ पेक्षा अगदी थोडी जास्त असली तरी शास्त्रज्ञांच्या मते दोन्ही वर्षे प्रभावीपणे बरोबरीचीच आहेत. मात्र, २०२४ हे वर्ष आधुनिक विक्रमातील (१८८० पासून) सर्वात उष्ण वर्ष ठरलं आहे. तरीही २०२५ मधील तापमान मध्य-२०व्या शतकाच्या तुलनेत अधिक वाढलंय.

नासाच्या गोडार्ड इन्स्टिट्यूटचा अहवाल: ऐतिहासिक सरासरीपेक्षा १.१९ अंश सेल्सिअसनंवर



नासाच्या गोडार्ड इन्स्टिट्यूट फॉर स्पेस स्टडीजनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे की, २०२५ मधील पृथ्वीची सरासरी पृष्ठभाग तापमान १९५१ ते १९८० या कालावधीच्या तुलनेत २.१४ अंश फॅरेनहाइट (१.१९ अंश सेल्सिअस) नं जास्त होते. हा अहवाल जगातील सर्वात मोठ्या हवामान डेटाबेसपैकी एकावर आधारित आहे. या डेटामध्ये जगभरातील २५,००० हून अधिक हवामान केंद्रांवरील हवेच्या तापमानाची नोंद, जहाजे आणि समुद्री बुयांद्वारे मोजलेले समुद्रपृष्ठभाग तापमान आणि अंटार्क्टिक खंडावरील केंद्रांचाही समावेश आहे. यामुळं दुर्गम भागांचाही समावेश होऊन जागतिक स्तरावरील पूर्ण कव्हरेज शक्य झालं.

स्वतंत्रपणे युके मेट ऑफिसच्या हॅडली सेंटर आणि युरोपियन कोपर्निकस क्लायमेट सर्व्हिसेस या संस्थांनीही वेगवेगळ्या पद्धती वापरून २०२५ ला विक्रमी वर्षामध्ये समाविष्ट केलं आहे. २०२५ मधील तापमान २०२३ शी बरोबरीची असली तरी हवामान बदलाची दीर्घकालीन प्रवृत्ती थांबलेली नाही. गेल्या दशकातील विक्रमी उष्णता आणि समुद्र-जमीन दोन्ही भागांतील वाढ हे मानवी क्रियांमुळं होणाऱ्या हरितगृह वायूंच्या वाढीचे थेट परिणाम आहे. तात्काळ उपाय न केल्यास भविष्यातील वर्षे आणखी उष्ण आणि धोकादायक ठरतील, असा शास्त्रज्ञांचा इशारा स्पष्ट आहे.

# एकनाथ शिंदे यांचा ठाण्याचा गड शिवसेनेनं राखला; आरक्षण सोडतीनंतर शिवसेनेचा महापौर बसणार

**एक्झिट पोलवाल्यांसोबत माझी अगोदरच चर्चा झाली होती! पण गोंधळच झाला !... त्यांनी आम्हाला १५० जागा मिळण्याचा दावा केला. ...आम्ही तर १३० जागांवरच निवडणूक लढविली!**



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं गड राखला आहे. निवडणुकीच्या आधीच ६ जागी बिनविरोध नगरसेवक निवडून आले. त्याचवेळी त्यांनी आपलं राजकीय वजन दाखवून दिलं. यावेळी शिवसेनेनं भाजपासोबत युती केल्यानंतर निवडणुकीत ८७ जागा लढून ६० जागा मिळाल्या. तर भाजपानं ४० जागा लढून २८ जागा मिळाल्या. उद्धव ठाकरेंची शिवसेना मनसेशी आघाडी करत ६५ जागा लढून २ जागा मिळवल्या. तर यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला खातं उघडता आलं नाही. राष्ट्रवादीच्या फटीनंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ८ जागा मिळाल्या तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला कळवा मुंब्र्यात ११ जागा मिळाल्या आहेत. मुंब्रा भागात एमआयएमला ५ जागा मिळाल्या आहेत तर एका जागी अपक्षाला विजय मिळाला आहे. या सर्व यशानंतर आरक्षण सोडत झाल्यावर आता शिवसेनेचा महापौर लवकरच ठाण्यात बसणार आहे.

सर्वाधिक जगा जिंकून येण्याचा आत्मविश्वास आणि भाजपाची मदत न घेता महापौर बसवता येईल अशी शक्यता वाटत असल्यामुळं, शिवसेनेनं अनेक बैठकानंतर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर युती केली. त्यानुसार यावेळी महानगरपालिका निवडणुका लढवल्या. भाजपामधील कार्यकर्ते सर्वच्या सर्व जागा स्वबळावर लढण्याच्या तयारीत होते, मात्र युती धर्म म्हणून युती करून ४० जागा लढवून २८ जागा जिंकल्या. आता पूर्ण बहुमत मिळाल्यामुळं शिवसेनेला सत्ता स्थापन करण्यासाठी कोणाचीही आवश्यकता नाही.

ठाण्यात सर्वात मोठा पक्ष आणि सर्वाधिक नगरसेवक असलेली शिवसेना महापौर पदावर दावा करणार आहे. महापौर पदासाठी अजूनही आरक्षण जाहीर न झाल्यामुळं नाव जाहीर करता येत नाही.

एकीकडं काँग्रेस, मनसे, रिपाई, वंचित बहुजन या पक्षांना आपलं खातं उघडता आलं नाही. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला देखील तीन जागेवर समाधान मानावं लागलं असताना, मुंब्रा भागातून प्रभाग ३० मधील एमआयएमचे चार नगरसेवक निवडणून आले आहेत.

पालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा चांगलाच धुव्वा उडाला आहे. एकेकाळी ठाणे जिल्हा हा बालेकिल्ला होता. त्यानंतर ठाण्यात काँग्रेसचा महापौर देखील होता. आता काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढत नामशेष झाला आहे. यावेळी काँग्रेसने ६६ उमेदवार निवडणुकीसाठी उभे केले होते.



## डिजिटल परिवर्तनाचे युग

कोरोना नंतरच्या काळात बहुतांश कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमचा पर्याय दिला. तेव्हापासून आजवर लाखो कर्मचारी वर्क फ्रॉम होम करत आहेत. कंपनी मोठ्या शहरातील, तर ऑनलाईन काम एखाद्या खेडेवजा गावातून करताना होणारी कसरत पाहता मानसिक संतुलन राखणे खूप महत्वाचे ठरते. टेक्नॉलॉजी आपल्याला भविष्यात कुठवर नेऊन ठेवणार आहे, याचा अंदाज आज एआयच्या जमान्यात बांधता येणे कठीण बनले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी नुकतेच राईट टू डिस्कनेक्ट हे खासगी विधेयक संसदेत मांडले. प्रत्येक कर्मचाऱ्याला कामाच्या वेळेव्यतिरिक्त आणि सुट्टीच्या दिवशी कामाशी संबंधित टेलिफोन कॉल आणि ई-मेलपासून डिस्कनेक्ट होण्याचा आणि कामाच्या वेळेव्यतिरिक्त कॉल आणि ई-मेलला उत्तर देण्यास नकार देण्याचा अधिकार आणि त्याच्याशी संबंधित किंवा त्याच्याशी संबंधित सर्व बाबींसाठी कर्मचारी कल्याण प्राधिकरण स्थापन करणे हा या विधेयकाचा हेतू आहे. डिजिटल आणि कम्युनिकेशन तंत्रज्ञानामुळे बहुतांश कामगार थेट आपल्या स्मार्टफोनवरून काम करू शकतात. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार कोणत्याही ठिकाणाहून काम करू शकणाऱ्या मोबाईल कामगारांचे प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक वाढण्याची अपेक्षा आहे. कामाच्या लवचिकतेच्या बाबतीत याचे फायदे असले तरी व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनातील सीमा धूसर होण्याचा धोका यामुळे वाढला आहे. एका अभ्यासातून असे आढळले आहे की, जर एखाद्या कर्मचाऱ्याला २४ तास उपलब्ध राहण्याची अपेक्षा असेल तर झोपेचा अभाव, ताणतणाव आणि भावनिकदृष्ट्या थकवा यासारखे धोके उद्भवतात. कॉल आणि ई-मेलला प्रतिसाद देण्याची ही सततची इच्छा (टेलिप्रेशर), दिवसभर ई-मेलची सतत तपासणी करणे यामुळे आठवड्याच्या शेवटी आणि सुट्टीच्या दिवशीदेखील कर्मचाऱ्यांचे मानसिक संतुलन बिघडू शकते, असे विधेयकात नमूद केले आहे. एका अभ्यासानुसार, कामाशी संबंधित संदेश आणि ई-मेलचे सतत निरीक्षण केल्याने कर्मचाऱ्यांच्या मेंदूवर स्थूलपणा निर्माण होऊ शकते. ही स्थिती म्हणजे तणाव, थकवा आणि निद्रानाश. जेव्हा कर्मचाऱ्यांवर कामाचा जास्त भार असतो, तेव्हा त्यांची उत्पादकता स्थिर राहते किंवा कामाच्या वेळेत वाढ झाल्याने ती कमी होते. २०१४ मध्ये स्टॅनफोर्ड विद्यापीठाने केलेल्या अभ्यासात आढळले आहे की, कर्मचाऱ्यांचे उत्पादन आणि उत्पादकता आठवड्यातून ५० कामाच्या तासानंतर कमी होते. जेव्हा कामगारांवर आठवड्यातून ६० तास कामाचा भार पडतो, तेव्हा त्यांची उत्पादकता कमी होते. संशोधनात असे दिसून आले आहे की, रात्री नऊनंतर कामाशी संबंधित कॉल आणि मेलला प्रतिसाद देणाऱ्या कर्मचाऱ्यांची झोपेची गुणवत्ता सर्वात वाईट होती. ज्यामुळे त्यांच्या उत्पादकतेवर परिणाम झाला. कामाच्या वेळेत त्यांच्या मालकाचे कॉल, ई-मेल इत्यादींना डिस्कनेक्ट करण्याचा आणि प्रतिसाद न देण्याचा त्यांचा अधिकार म्हणून राईट टू डिस्कनेक्ट ओळखला जातो. कर्मचाऱ्यांचे हक्क ओळखण्याचीही गरज आहे, त्यात कंपन्यांच्या स्पर्धात्मक गरजा आणि त्यांच्या विविध कार्य संस्कृतींचाही विचार केला जातो. नियम तोडण्याच्या अधिकारात लवचिकता आणि कर्मचाऱ्यांसोबत सेवा अटींवर वाटाघाटी करण्याचे काम वैयक्तिक कंपन्यांवर सोपविणे ही काळाची गरज आहे. विधेयकानुसार वादाच्या प्रकरणांमध्ये कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या कामाबाहेरील मागण्या स्पष्टपणे चार्टरमध्ये मांडणे आवश्यक आहे आणि कर्मचारी एकतर काम करण्याचा पर्याय निवडू शकतात किंवा डिस्कनेक्ट करण्याचा त्यांचा अधिकार लागू करू शकतात. कंपन्यांना दूरस्थपणे काम करणाऱ्या, टेलि-वर्क करणाऱ्या आणि कामासाठी प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतःचे धोरण तयार करण्याचे आदेश दिले जातील. नियोक्त्यांशी वाटाघाटी करण्यात कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी प्रत्येक कंपनीतील कर्मचारी कल्याण समित्यांची स्थापनादेखील आवश्यक आहे. गतिमान व्यवसायाच्या मागण्यांशी सुसंगत राहण्यासाठी, या वाटाघाटी नियमित अंतराने वारंवार होतील, याची खात्री करण्याची तरतूद समाविष्ट करावी. विधेयकातील तरतुदींचे पालन न केल्यास संस्थांवर (कंपन्या किंवा संस्था) त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या एक टक्का दराने दंड आकारण्याची तरतूद या विधेयकात आहे. कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक जीवनावर होणाऱ्या हायपर कनेक्टिव्हिटीच्या दुष्परिणामांना आळा घालण्यासाठी विधेयकात व्यावसायिक आणि वैयक्तिक वापरासाठी डिजिटल आणि संवाद साधनांचा वाजवी वापर करण्याबाबत कर्मचारी आणि नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी समूपदेशन सेवांची तरतूद आहे. कर्मचाऱ्याला डिजिटल विचलित होण्यापासून मुक्त करण्यासाठी आणि त्याला त्याच्या सभोवतालच्या लोकांशी खरोखर जोडण्यास सक्षम करण्यासाठी डिजिटल डिटॉक्स सेंटरची तरतूद करते. हे विधेयक कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे समर्थन करते. वैयक्तिक संस्थांना त्यांच्या कर्मचाऱ्यांशी तासांबाहेरच्या सेवा अटींवर वाटाघाटी करण्याचे आदेश देऊन आणि कर्मचाऱ्यांच्या डिस्कनेक्ट होण्याच्या अधिकाराचे समर्थन करून कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील ताण कमी करण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी डिस्कनेक्ट होण्याच्या अधिकाराला विधेयकातून मान्यता देण्याचा प्रयत्न आहे. सध्याच्या डिजिटल युगाचा रोजगार करारातील अटींवर थेट परिणाम होतो. पूर्वी कामाच्या वेळा ठरलेल्या होत्या. कंपन्यांमध्ये १० ते ५ ड्युटी असायची असाही एक काळ होता. मात्र, डिजिटल परिवर्तनामुळे काळाचे संदर्भ बदलले. कॉललेटर ई-मेलवर येऊ लागले. मुलाखतीही ऑनलाईन होऊ लागल्या. त्यामुळे वेळेची, प्रवासाच्या खर्चाची बचत झाली. कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचे स्वरुप बदलले. शासकीय पातळीवरही सर्व कामे ऑनलाईन होऊ लागले. व्हॉट्सअ‍ॅपवरचे आदेश अधिकृत मानण्याचे फर्मान निघाले.

# मुंबईत कोण जिंकलं? वाचा विजयी उमेदवारांची यादी

मुंबईतील २२७ जागांचे निकाल हाती येण्यास सुरुवात झाली आहे. मुंबईत ठाकरे बंधू विरुद्ध भाजपा अशी थेट लढत असल्याने येथील निकालांवर संपूर्ण राज्याचं लक्ष आहे. महायुतीमधील मित्रपक्ष भाजपा आणि एकनाथ शिंदेंची शिवसेने येथे स्वतंत्र लढत आहे. तर दुसरीकडे काँग्रेसने वंचितशी आघाडी केली आहे. मुंबईतील सत्तेच्या चाव्या नेमक्या कोणाच्या हातात जाणार याकडे सर्वांचं लक्ष आहे. दरम्यान असून, सर्व विजयी उमेदवारांची यादी येथे एका क्लिकवर जाणून घ्या.

मुंबई महापालिका निवडणुकीतील आतापर्यंतच्या विजेत्यांची यादी

१ रेखा यादव
फोरम परमार शिवसेना ठाकरे
शीतल म्हात्रे काँग्रेस
रेखा यादव शिवसेना शिंदे
२ तेजस्वी घोसाळकर
धनश्री कोलगे शिवसेना ठाकरे
तेजस्वी घोसाळकर भाजप
मेनका सिंह काँग्रेस
३ प्रकाश दरेकर
रोशनी गायकवाड शिवसेना ठाकरे
प्रदीप चौबे काँग्रेस
प्रकाश दरेकर भाजप
मनीष दुबे एनसीपी
४ मंगेश पांगारे
मंगेश पांगरे शिवसेना
राजू मुल्ला शिवसेना ठाकरे
राहुल विश्वकार्मा काँग्रेस
५ संजय घाडी शिवसेना
सुजाता पाटेकर शिवसेना ठाकरे
डॉ. नरेंद्र कुमार काँग्रेस
६ दिक्षा कारकर शिवसेना
संजना वेंगुर्लेकर शिवसेना ठाकरे
७ गणेश खणकर भाजपा
सौरभ घोसाळकर शिवसेना ठाकरे
अभिष फर्नांडिस काँग्रेस
ॲड कैलाषचंद्र नैलवाल आप
८ ॲड. रत्नाप्रभा जुन्नरकर काँग्रेस
योगिता पाटील भाजप
कस्तुरी रोहेकर मनसे
९ शिवानंद शेट्टी
सदानंद चव्हाण काँग्रेस
संजय भोसले शिवसेना ठाकरे
शिवानंद शेट्टी भाजप
१० जितेंद्र पटेल भाजप
विजय पाटील मनसे
डॉ अनिनाश संख्ये काँग्रेस
११ डॉ. आदिती खरसंगे शिवसेना
कविता माने मनसे
१२ सुवर्णा गवस शिवसेना
सारीका जोरे शिवसेना ठाकरे
१३ राणी द्विवेदी निघुट भाजप
आसावरी पाटील शिवसेना ठाकरे
१४ पूजा माईणकर मनसे
सीमा शिंदे भाजप
१५ जयश्री बांगेरा शिवसेना ठाकरे
जिगणासा शाह भाजप
१६ श्वेता कोरगावकर भाजप
स्वाती बोरकर शिवसेना ठाकरे
१७ संगीता कदम काँग्रेस
अश्विनी सरफरे शिवसेना ठाकरे
डॉ शिल्पा सांगोरे भाजप
१८ संध्या दोशी शिवसेना
सदिच्छा मोरे मनसे
१९ दक्षता कवठानाकर भाजप
लीना गुढेकर शिवसेना ठाकरे
२० दीपक (बाळा)तावडे
मस्तान खान काँग्रेस
दीपक तावडे भाजप
दिनेश साळावी मनसे
२१ लीना देहरकर
लीना देहरकर भाजप
सोनाली मिश्रा मनसे
२२ हिमांशू पारेख
प्रदीप कोठारी काँग्रेस
आशिष पाटील शिवसेना ठाकरे
हेमांशू पारेख भाजप
२३ किरण जाधव मनसे
मुरारी झा एन सी पी
शिवकुमार झा भाजप
?ॲड आर पी पांडे काँग्रेस
२४ स्वाती जैस्वाल भाजप
मुक्ता पटेल शिवसेना ठाकरे
२५ निशा परुळेकर बंगेरा भाजप
योगेश भोईर शिवसेना ठाकरे
डॉ मनोज कानोजिया सपा
२६ धर्मेंद्र काळे शिवसेना ठाकरे
प्रीतम पंडागळे भाजपा
सुरेशचंद्र राजहंस काँग्रेस
सुरेंद्र लांडगे एन सी पी
२७ निलम गुरव भाजप
आशा चांदर मनसे
२८ प्राजक्ता कोकणे शिवसेना ठाकरे
अजंता यादव काँग्रेस
वृषाली हुंडारे शिवसेना
२९ देव कानोजिया काँग्रेस
नितीन चौहान भाजप
सचिन पाटील शिवसेना ठाकरे
३० डॉ दिवाकर पाटील शिवसेना ठाकरे
धवल ओरा भाजप
रितेश पटेल आप
३१ भाग्यलक्ष्मी राज पुरोहित काँग्रेस
ज्योती मोरे शिवसेना ठाकरे
मनीष यादव भाजप
३२ गीता भंडारी
सेरीना किनी काँग्रेस
गीता भंडारी शिवसेना ठाकरे
मनाली भंडारी शिवसेना
३३ सारिका पार्टे शिवसेना ठाकरे
उज्वला वैती भाजप
कमरजहा सिद्दिकी काँग्रेस
३४ जॉन टेनिस भाजप
विकास दशपुते शिवसेना ठाकरे
विजय महाडिक शिवसेना
हैदर अली शेख काँग्रेस
३५ दीपक मोरे शिवसेना ठाकरे
योगेश वर्मा भाजप
पराग शाह काँग्रेस
३६ सिद्धार्थ शर्मा
भरत नागरेचा काँग्रेस
प्रशांत महाडिक मनसे
सिद्धार्थ शर्मा भाजप
३७ योगिता कदम
योगिता कदम शिवसेना ठाकरे
मीना दुबे काँग्रेस
प्रतिभा शिंदे भाजप
३८ रिशिता चाचे शिवसेना
सुरेखा परब मनसे
मयुरी स्वामी एन सी पी
३९ पुष्पा कळंबे शिवसेना ठाकरे
विनया सावंत शिवसेना
मधुसिंह काँग्रेस
सुमन सिंह एनसीपी
४० संजय आव्हाड भाजप
विलास घुले एनसीपी
तुळशीराम शिंदे शिवसेना ठाकरे
४१ राहुल उगले काँग्रेस
मानसी पाटील शिवसेना
?ॲड सुहास वाडकर शिवसेना ठाकरे
४२ प्रणिता निकम शिवसेना ठाकरे
धनश्री भरडकर शिवसेना
नम्रता शिंदे आप
४३ विनोद मिश्रा भाजप
अजित रावराणे एनसीपी शरद पवार
सुदर्शन सोनी काँग्रेस
४४ सावित्री यादव काँग्रेस
संगीता शर्मा भाजप
सायली सकपाळ शिवसेना ठाकरे
४५ संजय कांबळे भाजप
निरव बारोट शिवसेना ठाकरे
४६ योगिता कोळी भाजप
स्नेहिता देहलीकर मनसे
४७ गणेश गुरव शिवसेना ठाकरे
भक्तीनाथन चेट्टी एनसीपी
तेजिंदर तिवाना भाजप
परमिंदर भमरा काँग्रेस
४८ सलमा अलमेलकर शिवसेना
सिरिल पीटर डिसोजा एनसीपी
?ड गणेश शिंदे एनसीपी शरद पवार
रफिक शेख काँग्रेस
४९ संगीता कोळी काँग्रेस
सुमित्रा म्हात्रे भाजप
संगीता सुतार शिवसेना
५० राजपूत प्रतापसिंह
समीर मुणगेकर काँग्रेस
राजपूत प्रतापसिंह भाजप
तन्वी दिनेश राव शिवसेना ठाकरे
५१ वर्षा टेमवलकर
आरती चव्हाण एनसीपी शरद पवार
वर्षा टेंबवलकर शिवसेना
रेखा सिंग काँग्रेस
५२ प्रीती साटम
सुप्रिया गाढवे शिवसेना ठाकरे
प्रीती सातम भाजप
स्वाती सांगवी काँग्रेस
५३ अशोक खांडवे शिवसेना
जितेंद्र वळवी शिवसेना ठाकरे
५४ विप्लव अवसरे भाजप
अंकित प्रभू शिवसेना ठाकरे
५५ हर्ष पटेल भाजप
चेतन भट काँग्रेस
शैलेंद्र मोरे मनसे
५६ राजूल देसाई भाजप
लक्ष्मी भाटिया शिवसेना ठाकरे
डॉ रेवती आळवे सपा
५७ श्रीकला पिल्ले भाजप
गौरव राणे काँग्रेस
अजय विचारे एनसीपी
रोहन शिंदे शिवसेना ठाकरे
५८ विरेन जाधव मनसे
संदीप पटेल भाजप
सूर्यकांत मिश्रा काँग्रेस
५९ राकेश कोयल्हो एनसीपी
योगीराज दाभाडकर भाजप
यशोधर फणसे शिवसेना ठाकरे
जयेश संधे काँग्रेस
६० मेघना माने
सायली कुलकर्णी भाजप
मेघना माने शिवसेना ठाकरे
श्रेयान ग्लेंडीस काँग्रेस
६१ आफरीन टोळे एनसीपी
राजुल पटेल शिवसेना
सेजल सावंत शिवसेना ठाकरे
दिव्या सिंह काँग्रेस
६२ अहमद खान एनसीपी
?ॲड सैफ खान काँग्रेस
राजू पेडणेकर शिवसेना
जिशान मुलतानी शिवसेना ठाकरे
६३ देवेंद्र आंबेरकर शिवसेना ठाकरे
एम एन यादव एनसीपी
रुपेश सावरकर भाजप
ॲड प्रियंका सानप काँग्रेस
६४ हदिया फैसल कुरेशी एनसीपी
सबा हरून खान शिवसेना ठाकरे
हुदा आदम शेख खान काँग्रेस
सरिता राजपुरे भाजप
६५ प्रसाद अहिरे शिवसेना ठाकरे
विठ्ठल बंधेरी भाजप
हैदर सुफियान मोहसीन काँग्रेस
कमलेश घुलघुले सपा
६६ सना खान शिवसेना ठाकरे
आरती पांड्या भाजप
मकवाना खतिजा इस्माईल एनसीपी
हैदर मेहर मोहसीन काँग्रेस
६७ दीपक कोतेकर भाजप
कुशल धुरी मनसे
प्रकाश कोकरे सपा
६८ संदेश देसाई मनसे
रोहन राठोड भाजप
चेतन शेजवळ सपा
६९ योगेश गोरे शिवसेना ठाकरे
प्रकाश येडगे काँग्रेस
सुधा सिंग भाजप
७० प्रसाद नागावकर शिवसेना ठाकरे
अनिश मकवाणी भाजप
भूपेंद्र शिनगारे काँग्रेस
७१ ॲड श्रद्धा घाडगे काँग्रेस
श्रद्धा प्रभू शिवसेना
सुनिता मेहता भाजप
७२ गायत्री गुप्ता काँग्रेस
मनीषा पांचाळ शिवसेना ठाकरे
ममता यादव भाजप
७३ लोणा रावत दीप्ती वायकर पोतनीस शिवसेना
लोणा रावत शिवसेना ठाकरे
कोमल वाघमारे बसपा
७४ विद्या आर्या कांगणे मनसे
समिता सावंत काँग्रेस
उज्वला मोडक भाजप
७५ उमेश राणे भाजप
इमरान शेख काँग्रेस
प्रमोद सावंत शिवसेना ठाकरे
७६ स्नेहा भाटकर शिवसेना ठाकरे
बबनराव मदने एनसीपी
प्रकाश मुसळे भाजप
७७ प्रियांका आंबोळकर शिवसेना
ममता ठाकूर एनसीपी
शिवानी परब शिवसेना ठाकरे
मोनिका वाडेकर काँग्रेस
७८ फरीदा अन्सारी एनसीपी
रदबा जावेद शेख एनसीपी शरद पवार
शबाना सिद्दिकी काँग्रेस
सोफि नाझिया जब्बार शिवसेना
७९ मानसी जुवाटकर शिवसेना ठाकरे
सायली परब शिवसेना
प्रियांका मिश्रा काँग्रेस
ट्विंकल परमार एनसीपी
८० एकता चौधरी शिवसेना ठाकरे
दिशा यादव भाजप
एकता तरुणा कुंभार आप
८१ मोहिनी धामणे शिवसेना ठाकरे
केशर बेन मुर्जी पटेल भाजप
सरोज राय साहब काँग्रेस
८२ अमीन जगदीश्वरी भाजप
समरा खान काँग्रेस
पायल नाईक शिवसेना ठाकरे
८३ सोनाली समीर सावे
अड मेलिसिया डिसोजा काँग्रेस
सुरेखा सरोदे एनसीपी
सोनाली सावे शिवसेना ठाकरे
निधी सावंत शिवसेना
८४ डॉ मनीषा चौधरी एनसीपी
रूपाली दळवी मनसे
अंजली सामंत भाजप
८५ चेतन बेलकर मनसे
मिलिंद शिंदे भाजप
अय्यणार यादव वंचित
८६ क्लाईव्ह डायस शिवसेना ठाकरे
सुभाष पाताडे एनसीपी
रितेश राय शिवसेना
नितीन सलाग्रे काँग्रेस
८७ कृष्णा पारकर
पूजा विश्वनाथ महाडेश्वर शिवसेना ठाकरे गट
प्रमोद नार्वेकर काँग्रेस
कृष्णा पारकर भाजप
८८ श्रवरी सदा परब
श्रवरी सदा परब शिवसेना ठाकरे
डॉ प्रज्ञा सामंत भाजप
प्रवीण सावंत एनसीपी
८९ गितेश राऊत शिवसेना ठाकरे
राजेश नाईक शिवसेना
कमलेश चौरासिया काँग्रेस
९० मसुद अन्सारी शिवसेना ठाकरे
ज्योती उपाध्याय भाजप
?ड तुलिप मिरांडा काँग्रेस
सना कुरेशी सपा
९१ सगुण नाईक शिवसेना
कृष्णा म्हाडगुत शिवसेना ठाकरे
मोहम्मद रफीक शेख काँग्रेस
९२ अरुण कांबळे शिवसेना ठाकरे
इब्राहिम कुरेशी काँग्रेस
हाजी सलीम कुरेशी शिवसेना
युसुफ माडी एनसीपी
शबाना खान सपा
९३ रोहिणी कांबळे शिवसेना ठाकरे
डॉ सचिन तांबे एनसीपी
सुमित वजाळे शिवसेना
शरद शेजवळ काँग्रेस
सचिन कासारे रिपाई
९४ सुप्रिया पाठक काँग्रेस
पल्लवी पै सरमरकर शिवसेना
प्रज्ञा भुतकर शिवसेना ठाकरे
रश्मी मालुसरे एनसीपी
९५ सुहास आडीवरेकर भाजप
अमित पाटील एनसीपी
जगन्नाथ शास्त्री शिवसेना ठाकरे
९६ आयेशा खान एनसीपी
सना हाजी हलीम खान शिवसेना ठाकरे
विवाह तनवीर शेख शिवसेना
शबाना जाकीर काँग्रेस
९७ हेतल गाला भाजप
ममता चव्हाण शिवसेना ठाकरे
गौरी झाबडिया काँग्रेस
सुनिता यादव आप
९८ दीप्ती काते मनसे
अलका केरकर भाजप
प्रियदर्शी मिलारीपाली बसपा
९९ चिंतामणी निवाटे शिवसेना ठाकरे
जितेंद्र राऊत भाजप
सुनिता वावेकर काँग्रेस
१०० स्वप्ना म्हात्रे भाजप
साधना वरसकर शिवसेना ठाकरे
निदा शेख काँग्रेस
१०१ अनुश्री घोडके भाजप
?ॲड अक्षता मेनेझेस शिवसेना ठाकरे
सोनल तिवारी आप
१०२ जाहिद युनूस खान एनसीपी
रेहबर सिराज खान काँग्रेस
आनंद हजारे मनसे
निलेश हंडगर भाजप
१०३ हेतल मोरवेकर
दीप्ती पांचाळ मनसे
डॉ हेतल गाला मोरवेकर भाजप
मनीषा सोनवणे काँग्रेस
१०४ प्रकाश गंगाधरे
शिवाजी खडताळे एनसीपी
प्रकाश गंगाधरे भाजप
राजेश चव्हाण मनसे
हेमंत बापट काँग्रेस
१०५ अर्चना चवरे शिवसेना ठाकरे
अनिता वैती भाजप
शुभांगी वैती काँग्रेस
१०६ सत्यवान दळवी मनसे
प्रभाकर शिंदे भाजप
महेंद्र सोलंकी आप
१०७ नील किरीट सोमय्या
डॉ नील सोमय्या भाजप
वैशाली सकपाळ वंचित
१०८ शुभांगी केणे शिवसेना ठाकरे
दीपिका घाग भाजप
अश्विनी पोचे वंचित
१०९ अजय पटेल काँग्रेस
शहजादा मलिक एनसीपी
राजश्री मांडवीकर शिवसेना
सुरेश शिंदे शिवसेना ठाकरे
११० अशा कोपरकर काँग्रेस
रुखसार खान एनसीपी
चिरात हरिनाक्षी मोहन मनसे
जेनी शर्मा भाजप
१११ सारिका पवार भाजप
धनंजय पिसाळ एन सी पी
दीपक सावंत शिवसेना ठाकरे
?ड रितेश केणी वंचित
११२ किरण जैन आप
साक्षी दळवी भाजपा
दिपा शेटे राष्ट्रवादी (अजित पवार)
श्रेये शेट्टी काँग्रेस
११३ शबा जाधव राष्ट्रवादी (अजित पवार)
रुपेश पाटील शिवसेना (शिंदे)
बडे दिपमाला शिवसेना (ठाकरे)
सुर्यकात आमणे वंचित
११४ सुप्रिया धुरत शिवसेना (शिंदे)
राजूल पाटील शिवसेना (ठाकरे)
सिमा इंगळे वंचित
दिक्षा माने रिपब्लिकन सेना
११५ सपना जाधव आप
स्मिता परब भाजपा
फ्रान्सिस सुगंधी भाकप
ज्योती राजभोज मनसे
११६ श्रद्धा उतेकर शिवसेना (ठाकरे)
संगिता तुळसकर काँग्रेस
जागृती पाटील भाजपा
राजकन्या सरदार वंचित
११७ सुवर्णा करंजे शिवसेना (शिंदे)
कोमल पाटील राष्ट्रवादी (अजित पवार)
श्वेता पावसकर शिवसेना (ठाकरे)
वृक्षाली किर्सलोस्कर अपक्ष
११८ तेजस्वी गाडे शिवसेना शिंदे
डॉक्टर मंगला जाधव बसपा
सुनिता जाधव शिवसेना ठाकरे
सुनिता वीर वंचित
११९ विश्वजीत डोलम मनसे
राजेश सोनावळे शिवसेना शिंदे
चेतन अहिरे वंचित
प्रीतम गाडी रिपाई
१२० प्रशांत आढाव आप
खुशबू गुप्ता काँग्रेस
राजराजेश्वरी रेडकर शिवसेना शिंदे
विश्वास शिंदे शिवसेना ठाकरे
१२१ प्रतिमा खोपडे शिवसेना
प्रियदर्शनी ठाकरे शिवसेना ठाकरे
सेजल भोपी माकप
दिक्षिता विघ्ने वंचित
१२२ चंदन शर्मा भाजप
शबाना शेख राष्ट्रवादी (अजित पवार)
निलेश साळुंखे शिवसेना ठाकरे
विशाल खंडागळे वंचित
१२३ सुनील मोरे
अनिल निर्मळे भाजप
डॉ भारती बावदाने राष्ट्रवादी (अजित पवार)
सुनील मोरे शिवसेना ठाकरे
रामगोविंद यादव वंचित
१२४ सकीना शेख
ज्योती खान शिवसेना शिंदे
जाहिदा शेख राष्ट्रवादी (अजित पवार)
सकीना शेख शिवसेना ठाकरे
रिता भोसले वंचित
१२५ सुरेश आवळे शिवसेना शिंदे
मोंटू जोशी आप
हरिचंद्र जंगम राष्ट्रवादी (अजित पवार)
सतीश पवार शिवसेना ठाकरे
१२६ अर्चना संजय भालेराव
शादी खान काँग्रेस
प्रतीक्षा घुगे राष्ट्रवादी (अजित पवार)
अर्चना भालेराव भाजप
शिल्पा भोसले ठाकरे
१२७ वरूपा पाटील शिवसेना ठाकरे
अलका भगत भाजप
वर्षा थोरात वंचित
सुनिता टिकारे अपक्ष
१२८ सई शिर्के मनसे
अश्विनीताई हांडे शिवसेना शिंदे
निधी आडकर अपक्ष
सारिका पावडे अपक्ष
१२९ विजय गीते मनसे
कांचन बडे राष्ट्रवादी (अजित पवार)
अश्विनी मते भाजप
तृप्ती मातेले काँग्रेस
१३० हरीश करकेरा काँग्रेस
आनंद कोठावदे शिवसेना ठाकरे
धर्मेश गिरी भाजप
युवराज खैरनार अपक्ष
१३१ स्मिता खातू काँग्रेस
वृषाली चावक शिवसेना ठाकरे
राखी जाधव भाजप
मनीषा लोखंडे बसपा
१३२ रितू तावडे भाजप
क्रांती मोहिते शिवसेना ठाकरे
१३३ निर्मिती कानडे शिवसेना शिंदे
भाग्यश्री कदम मनसे
रश्मी शिंदे बसपा
सुप्रिया जाधव वंचित
१३४ मेहजबीन खान
समीरा कुरेशी शिवसेना शिंदे
शमीम खान शिवसेना ठाकरे
बेनझिर दिवटे काँग्रेस
मेहजाबिन खान एम आय एम
१३५ नवनाथ बन
वसंत कुंभार काँग्रेस
समीक्षा साखरे शिवसेना ठाकरे
नवनाथ बन भाजप
इर्शाद खान एम आय एम
१३६ नरेश पाटील शिवसेना ठाकरे
निजाम शेख शिवसेना शिंदे
साहेबे आलम सावंत काँग्रेस
जमीर पुरेशी एम आय एम
१३७ रामराव आंबेकर शिवसेना ठाकरे
निजामुद्दीन लाईन काँग्रेस
आयशा रफिक शिवसेना शिंदे
अहात युसुफ कुरेशी सपा
१३८ डॉ. अमोल आंबेकर शिवसेना शिंदे
वनु नियाज अहमद काँग्रेस
अर्जुन शिंदे शिवसेना ठाकरे
शेख मोहम्मद मन्सूर अहमद सपा
१३९ जरीना कुरेशी शिवसेना शिंदे
नायब गनिखान आप
शिरोमणी जगली मनसे
संदीप बनकर राष्ट्रवादी (अजित पवार)
१४० सिद्धार्थ उस्तुरे शिवसेना ठाकरे
संजय कांबळे राष्ट्रवादी (शरद पवार)
अशोक खैरे बसपा
सोनाली जाधव शिवसेना शिंदे
१४१ श्रुतिका मोरे भाजप
विठ्ठल लोकरे शिवसेना ठाकरे
सौरभ साठे राष्ट्रवादी (अजित पवार)
सुनील कदम भाकप
१४२ बाळाबाई कोडग काँग्रेस
अपेक्षा खांडेकर शिवसेना शिंदे
सुनंदा लोकरे शिवसेना ठाकरे
चांदणी श्रीवास्तव राष्ट्रवादी (अजित पवार)
१४३ संगीता कांबळे भाकप
रहमत खान राष्ट्रवादी (शरद पवार)
रचना गवस राष्ट्रवादी (अजित पवार)
शोभा जायभाये शिवसेना शिंदे
१४४ दिलीप पाटील राष्ट्रवादी (अजित पवार)
वसंत पाटील काँग्रेस
दिनेश पांचाळ भाजप
जनार्दन भोसले शिवसेना ठाकरे
१४५ शब्बीर खान राष्ट्रवादी (अजित पवार)
अॅ.सुफियाना अब्दुल मुबीन काँग्रेस
अरुण हुले शिवसेना ठाकरे
दीपक फालोड अपक्ष
१४६ समृद्धी काते
रमेश अहिरवळे बसपा
समृद्धी काते शिवसेना शिंदे
भाग्यश्री केदारे राष्ट्रवादी (अजित पवार)
राजेश पुरभे मनसे
१४७ प्रज्ञा सुनील सदाफुले
अनुपमा केदारे काँग्रेस
अंकिता द्रवे राष्ट्रवादी (अजित पवार)
जयश्री शिंदे शिवसेना ठाकरे
प्रज्ञा सुनील सदाफुले शिवसेना शिंदे गट
१४८ संजय नाईक शिवसेना शिंदे
सोमु पवार राष्ट्रवादी (अजित पवार)
राजेंद्र माहुलकर काँग्रेस
प्रमोद शिंदे शिवसेना ठाकरे
१४९ गणेश अवस्थ काँग्रेस
निखिल बिलये राष्ट्रवादी (अजित पवार)
अविनाश मयेकर मनसे
सुशम सावंत भाजप
१५० वनिता कोकरे भाजप
सविता थोरवे मनसे
वैशाली शेंडकर काँग्रेस
अन्सारी आयशा जोहर अली रिपब्लिक पार्टी
१५१ सोनिया थोरात शिवसेना ठाकरे
कशिश फुलवारिया भाजप
संगीता सुभाष भालेराव काँग्रेस
वंदना साबळे राष्ट्रवादी (अजित पवार)
१५२ कांबळे बापू बसपा
लक्ष्मण गायकवाड राष्ट्रवादी (अजित पवार)
सुधांशु दुनबळे मनसे
शशिकांत बनसोडे काँग्रेस
१५३ तनवी काते शिवसेना शिंदे
मीनाक्षी पाटणकर शिवसेना ठाकरे
स्नेहा गडकरी अपक्ष
१५४ आशिष गडकरी राष्ट्रवादी (अजित पवार)
शेखर चव्हाण शिवसेना ठाकरे
मुरली कुमार पिल्ले काँग्रेस
महादेव शिवगण भाजप
१५५ वर्षा शेट्टी भाजपा
स्नेहल शिवकर शिवसेना ठाकरे
अलका अहिरे रिपब्लिक सेना

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## पती-पत्नी झाले नगरसेवक, उधळला विजयी गुलाल, सांगली पालिकेत काँग्रेसचा जलवा, विजयी उमेदवारांची यादी

**दैनिक आपला विदर्भ**

**सांगली/प्रतिनिधी :** संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागून असलेल्या सांगली महापालिका निवडणुकीच्या मतम ेजणीला सुरुवात झाली आहे. अवघ्या तासांभरामध्ये विजयी उमेदवाराची नाव समोर आली आहे. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी गटाने बाजी मारली आहे. विशेष म्हणजे, एकाच घरात दिलेल्या दोन उमेदवारांचा विजय झाला आहे. काँग्रेसकडून पती आणि पत्नीला तिकीट देण्यात आलं होतं. दोन्ही नवरा-बायको विजयी झाले आहे.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर म हानगरपालिकेसाठी ७८ जागांसाठी निवडणूक लढवली जात आहे. सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू झाली. टपाली मतदानाचा कल हाती आल्यानंतर मुख्य ईव्हीएम मशीनची मतमोजणी सुरू झाली. पण, टपाली मतदानाच्या वेळी निवडणूक कर्मचाऱ्यांचा गलथान कारभार पाहण्यास मिळाला. जवळपास तासाभराने मतमोजणी सुरू झाली. आता निकालाचा पहिला कल हाती आहे. मिरजेच्या प्रभाग क्रमांक ५ मधून काँग्रेसकडून संजय मेंढे आणि त्यांच्या पत्नी बबिता मेंढे या दाम्पत्याला तिकीट दिलं होतं. या दाम्पत्याने दणदणीत विजय मिळवला आहे. विजयानंतर या विजयी उमेदवार जोडीने एकच जल्लोष केला. तर दुसरीकडे भाजप, शिवसेने शिंदे गट आणि काँग्रेसनेही दणदणीत आघाडी घेतली आहे.

दरम्यान, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी सरासरी ६० टक्के मतदान झालं आहे. सायंकाळी साडेसात वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया सुरू होती. सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची मतदानाची एकूण टक्केवारी हाती आली नसली तरी सरासरी ६० टक्के मतदान झाल्याचे अंदाज वर्तवण्यात येत आहे. तर २०१८ साली झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये ६२.१७ टक्के मतदान झाले होते. यंदाच्या निवडणुकीत म तदानाची टक्केवारी घटल्याची शक्यता असल्याने सर्वच उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

## पुण्यात रुपाली ठोंबरे, वसंत मोरेंचा दारुण पराभव; धंगेकरांच्या पत्नीसह मुलाचाही पराभव, बंडू आंदेकरला २०० मतंही नाही

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात महानगरपालिका निवडणुकीचा निकाल जाहीर होत आहे. काही प्रभागांचे चित्र स्पष्ट झाले आहे. यातील काही प्रभागांचे चित्र स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीमध्ये अनेक दिग्गज नेत्यांना आणि त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींना पराभवाचा सामना करावा लागत आहे. तर समोर आलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांचा पराभव झाला आहे, प्रभाग २५ आणि २६ अशा दोन प्रभागातून त्या निवडणूक लढवत होत्या. दोन्ही ठिकाणी त्या पराभूत झाल्या. तर सुरूवातीला त्यांनी ईव्हीएम मशीनवरती आक्षेप घेतला होता, त्यांनी काही वेळ मतमोजणी देखील बंद पाडली होती. मात्र दोन प्रभागांमध्ये त्यांचा पराभव झाल्याने त्यांच्यासह पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये चांगलेच चर्चेत आलेला आणि अपक्ष निवडणूक लढवणारा आंदेकर टोळीचा प्रमुख बंडू ऊर्फ सुर्यकांत आंदेकर याचाही प्रभाग क्रम ांक २४ मधून पराभव झाला आहे. बंडू आंदेकरांची भावजयी लक्ष्मी आंदेकर आणि सुन सोनाली आंदेकर या दोघी प्रभाग क्रमांक २३ मधून निवडून आल्या आहेत. या दोघींना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाने अधिकृत उमेदवारी दिली होती. मात्र अपक्ष लढणाऱ्या स्वत: बंडू आंदेकराचा महानगरपालिका निवडणुकीत पराभव झाला आहे. बंडू आंदेकरला फक्त १५३ मते मिळाली आहेत.

शिवसेना नेते आणि माजी आमदार रविंद्र धंगेकरांनी पुणे महापालिकेसाठी आपल्या मुलाला आणि पत्नीला उमेवारी दिली होती, मुलगा प्रणव आणि पत्नी प्रतिभा या दोघांचाही पराभव झाला आहे.

# शरद पवारांची साथ सोडून काँग्रेसला हात, प्रशांत जगताप यांना पक्षांतराचा लाभ; पुण्यातून विजयी!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नाट्यमय घडामोडीनंतर प्रशांत जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला रामराम करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. पक्ष बदलानंतरही जगताप यांनी विजयी परंपरा कायम राहिली आहे. सकाळपासून जगताप काही फेऱ्यांमध्ये आघाडीवर होते, काहींमध्ये पिछाडीवर. शेवटच्या मिनिटांमध्ये जगताप यांनी बाजी मारली. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार याम ुळे जगतापांची नाराजी पुण्यासह राज्यभर चर्चेचा विषय ठरली होती.

प्रशांत जगताप हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते. त्यांनी आधी पासूनच शरद पवारांना साथ दिली. जवळपास २७ वर्ष ते शरद पवारांसोबत होते. राष्ट्रवादीतील फुटीनंतर ही ते शरद पवारांसोबत होते.पुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे ते अध्यक्ष होते.पवारांचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. पण तत्त्वांशी तडजोड करण्याची वेळ येताच त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर जगताप यांच्या सारखा मोहरा आपल्या गळाला लावण्यासाठी सगळ्याच पक्षांनी प्रयत्न केले. पण जगताप यांनी काँग्रेसमध्येच जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या निर्णयाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

एकनाथ शिंदे तसंच उद्धव ठाकरे दोन्ही शिवसेना जगताप यांना पक्षात समाविष्ट करून घेण्यासाठी आतूर होते. परंतु जगताप यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करत सगळ्यांनाच धक्का दिला. १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हापासून जगताप राष्ट्रवादीत आहेत. पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून अनेक वर्ष काम केलं. वानवडी हा त्यांचा मतदारसंघ. २०१६-१७ मध्ये त्यांनी पुण्याचे महापौरपदही भूषवलं. २०२१ त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र २०२३ मध्ये पक्षात फूट पडली. शरद पवारांना अनेक नेते सोडून गेले. अजित पवारांच्या गटात एक एक नेता सहभागी होत होता. पण जगताप यांनी तेव्हा ही शरद पवारांची साथ सोडली नाही. राष्ट्रवादी शरद पवार पक्षातच राहीले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षांने त्यांना संधी दिली. २०२४ च्या निवडणुकीत ते हडपसर म तदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून मैदानात उतरले. यावेळी त्यांची लढत त्यांचेच एक वेळचे सहकारी चेतन तुपे यांच्या बरोबर झाली. तुपे यांना जगताप यांनी कडवी टक्कर दिली. पण त्यांचा अवघ्या ७ हजार म तांनी पराभव झाला.

जगताप यांच्या प्रवेशामुळे काँग्रेसला ताकदवान नेता मिळाला. पक्ष प्रवेशानंतर जगताप यांनी शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारावर निरंतर वाटचाल करणे, या वैचारिक पायावर समतावादी समाज घडवणे हे एक कार्यकर्ता म्हणून माझ्या जीवनाचे ध्येय आहे असे म्हटले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी आजपासून मी ''काँग्रेस''



पक्षात कार्यरत होत आहे. भारताला परकीय सत्तेपासून मुक्त करण्यासाठी काँग्रेसने यशस्वी लढा दिला, आजही काँग्रेस पक्ष भारताला धार्मिक-जातीय द्वेषापासून मुक्त करण्यासाठी लढत आहे. या लढ्याचे नेतृत्व करणारे, संविधानाच्या रक्षणार्थ बलाढ्य शक्तींना आव्हान देणारे राहुलजी गांधी, मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्त्वात मी एक कार्यकर्ता म्हणून पूर्ण ताकदीने योगदान देणार आहे असं त्यांनी स्पष्ट केलं होतं.

राजीनामा देण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्याशी चर्चा केली होती. मात्र यानंतरही त्यांनी राजीनामा दिला. अपक्ष म्हणून निवडणूक लढवायची का काँग्रेसच्या तिकिटावर अशा दोलायमान स्थितीत जगताप होते. अखेर त्यांनी काँग्रेस पक्षात जाण्याचा निर्णय घेतला होता.

## ....तर शिवसेना १२५ जागा जिंकली असती; संजय राऊतांनी स्पष्टच सांगितले



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई सह २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर होणार आहे. मुंबई महापालिकांचे निकाल समोर येत असून यात सुरुवातीच्या काही निकालांमध्ये भाजपला जास्त जागा मिळाल्याचे दिसतेय. अशा परिस्थितीत मुंबईतील भाजप मुख्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह अनेक बड्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष साजरा केला. मात्र अजून मुंबईतील अनेक भागांचे निकाल येणे बाकी आहे आणि त्यासंदर्भात शिवसेना युबीटी खासदार संजय राऊत यांनी आपली भूमिका स्पष्ट करत भाजपला खडे बोल सुनावले.

खासदार संजय राऊत म्हणाले की, 'मतमोजणीला काही ठिकाणी सुरुवात झालीये. त्यातील ८० ते ८५ टक्के निकाल हे शिवसेनेच्या विजयाचे आहेत. आताच मला सांगितलं की वैशाली पाटणकर विजयी झाल्या, विशाखा राऊत विजयी झाल्या, यशवंत किल्लेदार आघाडीवर आहेत. बांद्राला सुद्धा आमचे उमेदवार जिंकलेत, त्यानंतर भांडुप विक्रोळीम ध्ये शिवसेनेमध्ये उमेदवार आघाडीवर आहेत. सकाळी जे आकडे तुम्ही दाखवत होतात. भाजपकडून जो भ्रम निर्माण केला जातो होता. ते खोटे आकडे दाखवून तुम्ही काय करणार. अनेक ठिकाणी अटीतटीची लढत आहे. काटे की टक्कर आहे. पण जो तुम्ही फरक दाखवताय एवढा नाही. मनसेचे सुद्धा अनेक उमेदवार विजयी होतायत. भांडुपमध्ये त्यांचे दोन उम ेदवार जिंकले. मुंबईत इतर ठिकाणी त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत, तेव्हा त्यांचाही आकडा वाढेल. शरद पवार पक्षाला काही जागा मिळाल्याचं मी पाहिलं, अशावेळेला तुम्हीच आव्हानाची भाषा करताय'.

संजय राऊत पुढे म्हणाले की, 'म ुंबईच्या बाहेर काही महापालिकांमध्ये तुमचा विजय झालेला आहे त्याबद्दल तुमचे अभिनंदन. पण मुंबईची लढाई त्या सगळ्यांपेक्षा मोठी आणि वेगळी आहे. आणि ती शेवटच्या क्षणापर्यंत आणि शेवटच्या श्वासापर्यंत ही लढाई आमच्याकडून लढली जाईल. ठाकरेंना आव्हान देण्याचा प्रयत्न झाला, पण त्या आव्हानाला मर्यादा आहेत. सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर तुम्ही जागा नक्कीच जिंकला होता पण अजून लढाई संपली कुठे? साडेदहा वाजतील किंवा ११ वाजतील पूर्ण निकाल हाती यायला, त्यानंतर आपण बोलू. याक्षणी मला चित्र असे दिसतेय की लढाई बरोबरीस सुरु आहे आणि काहीही होऊ शकते'.

संपूर्ण निकाल हाती येण्यापूर्वीच भाजपने जल्लोष केला यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, 'तुम्ही शिवसेना फोडून हा विजय मिळवताय. जर शिवसेना फुटली नसती तर शिवसेना एकटी १२० ते १२५ जागांवर जिंकली असती. आणि भाजपचा खेळ ५० पर्यंत येऊन अटकळ असता. हे सगळ्यांना माहितीये,. पण मुंबईवर महापौर बसवण्यासाठी तुम्ही शिवसेना फोडलीत. मराठी माणसाला एकत्र आणण्याचा जो आमचा प्रयत्न होता त्याला तुम्ही सुरुंग लावलात. तरीही मराठी माणूस आजही उद्धव आणि राज ठाकरे यांच्याच मागे उभा आहे. हे तुम्हाला निकालावरून दिसेल'.

# विजयी हॅटट्रिक करण्यासाठी स्मृतीचा संघ उतरणार मैदानात; गुजरातचं मजबूत आव्हान

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखालील आरसीबी पुढील चार दिवसांत (१६-१९ जानेवारी) तीन सामने खेळणार आहे. हे व्यस्त वेळापत्रक आज शुक्रवारपासून सुरु होईल, जेव्हा बंगळुरु संघ नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर गुजरात जायंट्सशी सामना करेल. विशेष म्हणजे, महिला प्रीमियर लीगच्या इतिहासात हे प्रथमच घडेल जेव्हा हे दोन्ही संघ या ठिकाणी एकमेकांसमोर येतील. आरसीबीचा विजयी मालिका सुरु ठेवण्याचा प्रयत्न : आरसीबी हा या हंगामात आतापर्यंत एकमेव अपराजित संघ आहे, त्यांनी दोनपैकी दोन साम ने जिंकले आहेत, यात त्यांनी मुंबई इंडियन्स आणि यूपी वॉरियर्सना हरवलं आहे. त्यांची विजयी मालिका सुरु ठेवण्यासाठी, स्मृती मंधानाचा संघ आता



ॲशले गार्डनरच्या गुजरात जायंट्सशी सामना करेल, ज्यांनी एमआयविरुद्ध पराभव पत्करला आहे, तर यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्यांचे पहिले दोन सामने जिंकले आहेत.

दोन्ही संघाचा हेड टू हेड रेकॉर्ड काय : महिला प्रीमियर लीगच्या इतिहासात, बंगळुरु आणि गुजरातनं एकमेकांविरुद्ध सहा सामने खेळले आहेत, दोन्ही संघांनी प्रत्येकी ३ विजय मिळवले आहेत. आरसीबीनं डीवायपीएल स्टेडियमवर पाचपैकी तीन सामने जिंकले आहेत आणि दोन गमावले आहेत. दुसरीकडे, गुजरातनं या ठिकाणी खेळलेल्या सहा सामन्यांपैकी दोन जिंकले आहेत आणि चार गमावले आहेत.

हवामान आणि खेळपट्टीचा अहवाल काय : आज नवी मुंबईतील तापमान १९ ते ३१ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची अपेक्षा आहे. तर निरभ्र आकाश अपेक्षित आहे, पावसाचा अंदाज नाही. ताशी ३ ते ८ किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची अपेक्षा आहे. रात्री थोडासा दवही पाठलाग करणाऱ्या संघाला अनुकूल असू शकतो. आरसीबी आणि गुजरात यांच्यातील हा ेंइअ सामना उत्तम ठरु शकतो. कारण नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवरील खेळपट्टी फलंदाजीला अनुकूल आहे. अनेकदा संघांनी १५० चा टप्पा सहज ओलांडताना पाहिलं आहे, ज्यामुळं उच्च धावसंख्या असलेल्या सामन्यासाठी जागा मिळते. नंतर फलंदाजी करणं अनेकदा फायदेशीर ठरलं आहे.

सामना कुठे आणि कसा पाहायचा : बंगळुरु आणि गुजरात यांच्यातील सामना १६ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ७:३० वाजता सुरु होईल. दोन्ही कर्णधार संध्याकाळी ७ वाजता टॉससाठी मैदानात येतील. क्रिकेट चाहते स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर या सामन्याचा आनंद घेऊ शकतात. तसंच सामना जिओहॉटस्टारवर ऑनलाइन स्ट्रीम केला जाईल.

दोन्ही संघांची संभाव्य प्लेइंग ११ :

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु : ग्रेस हैरिस, स्मृति मंधाना (कर्णधार), डी हेमलता, ऋचा घोष (विकेटकीपर), गौतमी नाइक, राधा यादव, नादिन डी क्लार्क, अरुंधती रेड्डी, श्रेयंका पाटिल, लिंसे स्मिथ, लॉरेन बेल

गुजरात जायंट्स : बेथ मूनी (विकेटकीपर), सोफी डेवीने, आयुषी सोनी, एशले गार्डनर (कर्णधार), जॉर्जिया वेयरहम, भारती फुलमाली, काशवी गौतम, कनिका आहूजा, तनुजा कंवर, राजेश्वरी गायकवात्रड, रेनुका सिंह.


## शब्दकोडे क्र. 65

आडवे शब्द

१. पुलंचा लेखक म्हणून अखेरचा चित्रपट- 'एक होता -----' ३. वार्ताहर ७. दाद, पोहोच ९. स्पष्ट उच्चार करता न येणारा १०. गतीमान १२. आरोळी १४. यावर्षी १५. गडीमाणसे १८. 'नॅनो' आणणारे टाटा २१. कंटाळवणे (भाषण) २३. करायला गेला मारुती आणि झाले ---! २५. राष्ट्राची सीमा २९. मोका, संधी ३१. विश्वासघातकी ३२. खाटीक ३३. पदर ३४. दबा धरणे ३६. किरकोळ सामान ३९. आश्चर्याची गोष्ट ४२. आमटे, आढाव या समाजसेवकांचे प्रचलित नाव ४४. मोठी गाडी (सं.) ४६. दारावरील खुणेचा आवाज ४८. सजीव-निर्जीव सर्व ५०. नाकावरचा राग ५२. एक जंगली फूल ५३. भिक्षापात्र ५४. रक्त देणे ५७अ. कूळ कायद्याचे मूळ तत्त्व ६१. तात्काळ ६४. विषमच्या विरुद्ध ६६. केसांची बट ६८. पावलोपावली ६९. श्री विष्णूचे एक नाव ७१. किंचित वाकडा ७३. नवरत्नांपैकी एक प्राणिज रत्न ७४. कारस्थानी ७५. दाट, घट्ट ७६. अभिप्राय

उभे शब्द

१. प्रशाला २. क्रिकेटमधील सहाचा फटका ३. च्या बद्दल ४. अखेर, शेवट ५. वैरी ६. अंगातीक मस्ती, जोम ७. जन्मदाता ८. मनात संशय निर्माण होणे याअर्थी वाक्‌प्रचार ११. बडबड्या १३. पद्धतीनुसार १६. लक्ष्मी १७. बाजू, काठ १९. पुरुष २०. खोट्या नाण्याचा आवाज २२. टाळाटाळ, चुकवाचुकव २४. वार २६. हद्दीच्या पलीकडे २७. मिठाची चव २८. शिर्डीचे संत २९. अमावस्या ३०. वारा (सं.) ३१. होम ३५. सैन्याचे पथक ३७. घाबरणे ३८. तफावत, अंतर ४०. जंगलात विहार करणारे प्राणी ४१. परमेश्वर ४२. भारतभूषणचा गाजलेला सिनेमा, बैजू --- ४३. केर ४५. प्रेतावरील कापड ४६. रोखलेली नजर ४७. शेंगेवरील आवरण ४९. युद्ध, मारामारीत रक्त सांडणे ५१. घटस्फोट ५३. दगडाचा पातळ पापुद्रा ५५. नाठाळ, आडमुठ्या ५६. खळबळजनक ५७. चुलती ५८. सेनानायक ५९. हिंदीत राजीनामा ६०. वजनदार ६२. पाण्याचा गोंगाट? ६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ ६५. शूर पुरुष ६७. हिंदुस्थान ६९. सततचे नामस्मरण ७०. पर्वत ७२. समान, तुल्यबळ



### शब्दकोडे क्र. 64 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कुलवधू ४.कानवला ७.रगमतगमत १२.माग १३.पहेलवान १५.मगर १६.नोट १७.रब १८.लव १९.राजराणी २१.मोह २२.वग २४.जयजयकार २८.खास २९.रज ३१.कसाबसा ३३.सावज ३६.मासेमारी ३८.हर हर ४०.तन मन ४३.पाडवा ४५.सवत ४६.पापा ४७.मकर ४८.कल्प ४९.कळस ५०.सतत ५१.साव ५२.मत ५४.लगत ५६.टपाल ५८.टोळ ५९.सहज ६२.पोक ६३.बरसात ६५.कोरी ६६.अवयव ६७.दामचुंबक ६९.याचक ७०.ठार मारणे ७३.तगर ७५.रूस ७७.मानव ७९.जर ८०.रसद ८४.नरकवास ८५.साम ८६.मनमुराद

उभे उत्तर

१.कुमारवय २.लगबग ३.धूप ४.कालवण ५.नव ६.वनराज ७.रमणीय ८.मग ९.तर १०.मनोहर ११.तट १४.हेल २०.राजस २१.मोका २३.कसाब २५.जर २६. यजमान २६अ.खासा २७.वसाहत २८.खाज ३०.परिवार ३१.कवडसा ३२.साहस ३४.वर ३५.मौन ३७.मादक ३९.रवरव ४०.तपास ४१.मद्रास ४३.पारखणे ४४.वायफट ४६.पाळत ४७.मतलब ४९.कमळ ५१.साल ५३.ना हरकत ५७.पाणवठा ५८.टोकदार ५९.सबब ६०.जसा ६१.ठेव ६४.तयार ६५.कोकरू ६६.असामान्य ६८.मणेर ७१.रजक ७२.मारवा ७४.गरम ७६.सरोद ७८.वन ८१.ससा ८२.दम ८३.चमू

## वृत्तविशेष...

### मुंबईत ठाकरे गटाची शिंदेंवर मात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'आपलीच शिवसेना खरी, ठाकरे गट आहे कुठे', असा सवाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या नेतेमंडळींकडून केला जात होता. प्रत्यक्षात निवडणूक कलावरून मुंबईत तरी ठाकरे गटाने शिंदे यांच्यावर मात केली आहे.

मुंबईत सत्तेसाठी भाजप आणि ठाकरे गटात चुरस होती. शिवसेना शिंदे गटाने मात्र ठाकरेंचा पक्ष आहे कुठे, असा सवाल करीत ठाकरे यांना डिवचले होते. निकालाच्या पहिल्या टप्प्यात शिवसेना ठाकरे गट ६० तर शिंदे गट २५ जागांवर आघाडीवर होता. ठाकरे गटाला सत्ता मिळणे कठीण असले तरी शिंदे यांच्यावर मात केली याचे थोडे का असेना ठाकरे गटाला समाधान असेल.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना ठाकरे व शिंदे गटात प्रचंड चुरस निर्माण झाली होती. लोकसभा निवडणुकीत मुंबईत ठाकरे गटाचे तीन तर शिंदे गटाचा एक खासदार निवडून आला होता. विधानसभा निवडणुकीतही ठाकरे गटाला शिंदे यांच्यापेक्षा अधिक यश मिळाले होते. महानगरपालिकेतही हाच कल कायम राहिला आहे.

शिंदे गटाने कायदेशीरदृष्ट्या आपलीच शिवसेना ही खरी शिवसेना असल्याचा कायम दावा केला. ठाकरे गट आहे कुठे, असा सवाल केला होता. शिवसेनेतील फुटीवर अजूनही प्रकरण न्यायप्रवीष्ठ आहे. जनतेच्या न्यायालयात मात्र मुंबईतील तिन्ही निवडणुकांमध्ये ठाकरे गट हा शिंदेपेक्षा वरचढ असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत आमच्याच शिवसेनेला जनतेने कौल दिल्याचे शिवसेना खासदार अरविंद सावंत यांनी म्हटले आहे.

### दहिसरमध्ये तेजस्वी घोसाळकरांचा महाविजय! उबठाच्या धनश्री कोलगेंचा दारुण पराभव; मुंबईत भाजपची मुसंडी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मतमोजणीत भाजपने दहिसरच्या बालेकिल्ल्यात भगवा फडकवला आहे. प्रभाग क्रमांक २ मधून भाजपच्या उमेदवार तेजस्वी अभिषेक घोसाळकर यांनी तब्बल १०,७२५ मतांच्या प्रचंड फरकाने ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार धनश्री कोलगे यांचा पराभव केला असून, या विजयाने उत्तर मुंबईत भाजपचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

प्रतिष्ठेची लढाई आणि राजकीय संघर्ष

माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या दुर्दैवी निधनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत तेजस्वी घोसाळकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे ही जागा शिवसेना ठाकरे गटासाठी केवळ प्रतिष्ठेचीच नाही, तर 'निष्ठावंत विरुद्ध पक्ष बदलणारे' अशा संघर्षाची बनली होती. ठाकरे गट आणि मनसे युतीने याठिकाणी मोठे आव्हान उभे केले होते, मात्र तेजस्वी घोसाळकर यांनी सर्व समीकरणे मोडीत काढत निर्विवाद यश मिळवले. प्रचारादरम्यान तेजस्वी घोसाळकर यांनी मांडलेले भविष्यातील विकासाचे मुद्दे आणि मतदारांशी साधलेला भावनिक संवाद त्यांच्या पथ्यावर पडला. अभिषेक घोसाळकर यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आश्वासन आणि भाजपची ताकद यामुळे मतदारांनी त्यांना कौल दिला. १०,७२५ मतांचा हा मोठा फरक हेच दर्शवतो की, मतदारांनी केवळ सहानुभूतीच नाही तर तेजस्वी यांच्या नेतृत्वावरही विश्वास दाखवला आहे.

दहिसरमध्ये जल्लोष

निकालाची अधिकृत घोषणा होताच दहिसर परिसरात भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत तेजस्वी घोसाळकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले. ''हा विजय प्रभाग २ मधील जनतेचा आणि अभिषेक घोसाळकर यांच्या कार्याचा विजय आहे,'' अशा भावना यावेळी तेजस्वी यांनी व्यक्त केल्या.

### विधानसभेला पत्नीचा पराभव, बीएमसीमध्ये लेकही हरली, शिंदे गटाच्या खासदाराला धक्का

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेची निवडणूक अतिशय चुरशीची होत असून मतमोजणीच्या फेऱ्यागणिक मोठा उलटफेर होत आहे. सुरुवातीच्या मतमोजणीच्या कलात महायुती आघाडीवर असून ठाकरे गट-मनसे हे पिछाडीवर आहेत. मुंबईतील वॉर्ड क्रमांक ७३ मध्ये मोठा उलटफेर झाला आहे. खासदार रविंद्र वायकर यांची कन्या दिप्ती वायकर-पोतनीस यांना पराभवाचा धक्का बसला आहे.

शिंदे गटाच्या दिप्ती वायकर यांचा शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार लोना राजेंद्रसिंह रावत यांनी पराभव केला. रविंद्र वायकर यांचा लोकसभा निवडणुकीत अवघ्या ४८ मतांनी विजय झाला होता. त्यानंतर विधानसभेत पत्नी आणि आता बीएमसीमध्ये मुलगी पराभूत झाली.

यापूर्वी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर यांचाही याच परिसरात अत्यंत निसटता पराभव झाला होता. दीप्ती वायकर यांच्या रूपाने वायकर कुटुंबाने पुन्हा एकदा या मतदारसंघावर पकड मिळवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु मतदारांनी त्यांना कौल दिला नाही.

जोगेश्वरी पूर्व हा भाग शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. इथे ठाकरे गटाच्या उमेदवाराने दीप्ती वायकर यांच्यासमोर मोठे आव्हान उभे केले होते.

वॉर्ड क्रमांक १८३ मध्ये काँग्रेसच्या आशा काळे यांनी शिंदे गटाच्या वैशाली शेवाळे यांचा १४५० मतांनी पराभव केला. शिंदे गटाने या वॉर्डमधून माजी खासदार राहुल शेवाळे यांच्या वहिनी वैशाली शेवाळे यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे शेवाळे यांना हा मोठा धक्का आहे. वैशाली शेवाळे या माजी नगरसेविका आहेत. ठाकरे गट आणि मनसेच्या पारुबाई कटके यांनाही पराभवाचा धक्का बसला आहे.

मुंबई आणि पुण्यासह महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीचे निकाल पाहण्यासाठी येथे क्लिक करा आणि ताज्या निवडणूक बातम्या तसेच अपडेट्सची यादी मिळवा.

# देवदूतच...! सावकारी जाचातून शेतकऱ्यांची सुटका

## जिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार ; शेतकऱ्यांनी मानले आभार

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अवैध सावकारी कर्जाच्या त्रासातून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक आणि आत्महत्यांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी पुढाकार घेवून जिल्ह्याच्या विविध भागातील अवैध सावकाराकडील जमीनी परत करण्याची मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेंतर्गत ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी परत मिळाल्या त्यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांचा सत्कार करुन आभार व्यक्त केले. जिल्हाधिकारी आमच्यासाठी देवदूतच असल्याची भावना देखील शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक कार्यालयामार्फत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार अवैध सावकाराकडील जमीनी शेतकऱ्यांना परत करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत जलदगतीने सुनावणी घेवून प्रकरण निकाली काढले जात आहेत. यातील बहुतांशी प्रकरणांमध्ये चौकशीअंती शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय दिले जात असून अवैध सावकारांवर गुन्हा देखील दाखल केले जात आहे. या मोहिमेसाठी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी घेतलेला पुढाकार आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या कामकाजाचे कौतुकही शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

या शेतकऱ्यामध्ये विशेषतः नागेश केशव कोल्हारे रा. घाटबोरी ती. मेहकर यांची सावकाराकडील ३ एकर २४ गुंठे जमीन, विजय बा. व्यवहारे रा. पोफळी ता. मोताळा यांची ६२ गुंठे जमीन, रविंद्र कांडेलकर रा. वाघोळा ता. मलकापूर यांची ८२ गुंठे जमीन, विजय रामदास राठोड रा. हिवरा गडलिंग ता. सिंदखेड राजा ७ एकर ३० गुंठे, शंकर कोंडिबा वाघ रा. पांगरी ता. देऊळगाव राजा यांची १.३८ हेक्टर, संजय उत्तम पाचरणे रा. मेहकर यांची ०.७१ हेक्टर जमीन त्यांना परत मिळाल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी सावकारी कर्जामुळे मातृत्व हरवलेल्या वैष्णवी कैलास ढोले या मुलीने आणि तिच्या वडिलांनी देखील त्यांच्या संघर्षात जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी शेतकऱ्यांचा सत्कार स्वीकारुन जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाने लोकहिताचे कायदे केले आहेत. जिल्ह्यात या कायद्यांची चोख अंमलबजावणी करुन शेतकरी व नागरिकांना न्याय देण्याचे माझे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बुलढाणा जिल्ह्यात अवैध सावकारांकडून होत असलेली पिळवणूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांनी निर्भयपणे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

या लोकोपयोगी कार्याबद्दल शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीच्या चिखली येथील शिवाजी विद्यालयामार्फत जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांचा सत्कार देखील करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### अवैध सावकारांकडील ७४ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत

यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक प्रशासनाने मोहिमेंतर्गत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार जिल्ह्यातील ६९ प्रकरणातील अवैध सावकारांकडील ७४.२७ हेक्टर आर शेतजमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे. यात ५५ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली.

### आश्चर्य! मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील मतदाराचे उपमुख्यमंत्र्यांया बारामतीत नाव

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ असल्याचे समोर आले. काही उमेदवारांना याचा फटका बसला. केंद्रीय नितीन गडकरी यांच्या घरातील मंडळीचे नावही वेगवेगळ्या ठिकाणी होते. भाजप उमेदवार संगिता गिऱ्हे यांच्या घरातील मंडळींचे नाव दोन प्रभाग गेले. प्रभाग १० मधीलच स्नेहा डेकाटे यांच्या घरातील लोकांची नावे चक्क प्रभाग नाही वेगळ्याच झोनमध्ये टाकण्यात आले. संपूर्ण शहारतच हा घोळ दिसून आला. त्याचा परिणाम मतदानाच्या टक्क्यावर झाला. काही मतदारांचा जिल्हा बदलण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील एका मतदाराचे नाव चक्क पुणे जिल्ह्यातील बारामतीत दाखविण्यात आले. त्यामुळे त्याला मतदानच करता आले नाही. त्यामुळे या मतदाराला मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागले.

नागेश माणिक मून हा ५२, अशोक बुद्ध विहिराजवळ, इमामवाडाचा रहिवासी असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम मतदार संघातील आहे. हे क्षेत्र प्रभाग १७ अंतर्गत येते. मागील निवडणुकीत त्याचे उंटखान्यातील मिलिंद महाविद्यालयातील केंद्रात मतदान होते.

यंदा मतदानासाठी नाव शोधले असता त्याला पुणे जिल्ह्यातील बारामतीत नाव असल्याचे दिसून आले. त्याने सांगितले की, घरातील इतर सर्व कुटुंबाचे राष्ट्रीय मिल मजदूर संघातील मतदान केंद्रावर नाव होते. त्यामुळे तिथे जावून पाहिले असता नाव दिसून आले नाही. त्यानंतर मिलिंद महाविद्यालयात सुद्धा तपासणी केली.

### टोकियोमध्ये अल्लू अर्जुन जपानी भाषा बोलल्यानंतर चाहते झाले प्रभावित, पुष्पा २ होईल रिलीज...

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ स्टार अल्लू अर्जुन पुन्हा एकदा त्याच्या पुष्पा २मुळं चर्चेत आहे. या चित्रपटानं भारतासह जगभरात प्रचंड कमाई केली होती. आता पुन्हा एकदा हा चित्रपट जपानीज भाषेत जपानमध्ये रिलीज करण्यात येत आहे. आता या देशामध्ये पुष्पा २: द रुल या चित्रपटाचा खूप क्रेझ असल्याचा दिसत आहे. या चित्रपटाला पाहण्यासाठी जपानमधील अनेक लोक जाईल ही अपेक्षा केली जात आहे. अल्लू अर्जुननं पुष्पा फ्रँचायझीमध्ये पुष्पा राजची भूमिका साकारून जागतिक प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. प्रेक्षकांना त्याची शैली आणि स्क्रीन उपस्थिती खूप धमाकेदार वाटत आहे. हा चित्रपट १६ जानेवारी २०२६ रोजी पुष्पा कुनलिन या शीर्षकाखाली प्रदर्शित होणार आहे. नुकताच अल्लू अर्जुन हा टोकियोमध्ये गेला आहे. तो सध्या आपल्या चित्रपटाचं जपानमध्ये खूप प्रमोशन करत आहे.

पुष्पा २ चित्रपट होईल जपानमध्ये रिलीज : आयकॉन स्टार अल्लू अर्जुनची क्रेझ जगभरात आहे. निर्मात्यांनी आता सोशल मीडियावर टोकियो प्रीमियरचा व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये, अल्लू अर्जुन जपानी भाषेत पुष्पामधील त्याचा आयकॉनिक संवाद बोलताना दिसतो. तो संवाद सादर करत असताना, प्रेक्षक प्रचंड टाळ्या वाजवतात. व्हिडिओ शेअर करताना निर्मात्यांनी लिहिलं की, ''कोनिचिवा, जपान आयकॉन स्टार अल्लू अर्जुन टोकियो प्रीमियरमध्ये त्याच्या पुष्पा २ चित्रपटातील संवाद जपानी भाषेत बोलून प्रेक्षकांना आश्चर्यचकित करतो. १६ जानेवारी रोजी जपानमध्ये भव्य प्रदर्शनासाठी प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साह. वितरक गीक पिक्चर्स आणि शोचिकू यांनी मैत्री मूव्ही मेकर्स आणि सुकुमार रायटिंग्जसह जपानी चित्रपटगृहांमध्ये पुष्पाची क्रेझ वाढवली आहे. हा चित्रपट जपानमधील अंदाजे २५० स्क्रीनवर प्रदर्शित होणार आहे.

## देवेंद्र फडणवीसांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा पराभव; अमरावतीत भाजपाला मोठा धक्का!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती महापालिका निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा पराभव झाला आहे. अटीतटीच्या लढाईत काँग्रेसचे उमेदवार संजय शिरभाते यांनी कलोती यांना पराभूत केले आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षामुळेच फडणवीस यांच्या मामेभावाचा पराभव झाला, असा आरोप भाजपाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी केला आहे. यादरम्यान विवेक कलोती यांच्या पराभवावर भारतीय जनता पक्षाने आपली प्रतिक्रिया दिली आहे.

अमरावतीत कोण आघाडीवर?

अमरावती महापालिकेतील ८७ जागांसाठी गुरुवारी (१४ जानेवारी) शांततेत मतदान पार पडले. या निवडणुकीत भाजपा विरुद्ध काँग्रेस असा चुरशीचा सामना पाहायला मिळणार होता. मात्र, प्रचाराच्या धामधुमीत आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाने अचानक भाजपाची साथ सोडली. त्यामुळे काँग्रेस व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील उमेदवारांच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या. शुक्रवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होताच भाजपा व काँग्रेसने मोठी आघाडी घेतली होती; तर रवी राणा यांच्या पक्षातील उमेदवार पिछाडीवर होते. अमरावतीत भाजपा विरुद्ध काँग्रेस अशी चुरशीची लढत पाहायला मिळत आहे.



फडणवीसांचे मामेभाऊ पराभूत

अमरावती महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधून भारतीय जनता पक्षाने देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांनी उमेदवारी दिली होती. त्यांच्याविरोधात काँग्रेसने संजय शिरभाते यांना मैदानात उतरले होते. यावेळी अटीतटीच्या लढाईत शिरभाते यांनी कलोती यांचा पराभव केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मामेभाऊ महापालिका निवडणुकीत पराभूत झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यापूर्वी २०१८ मध्ये अमरावती महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी विवेक कलोती यांची बिनविरोध निवड झाली होती. फडणवीस यांचे मामभाऊ असल्यामुळेच त्यांना स्थायी समितीचे सभापतीपद मिळाल्याची चर्चा रंगली होती. मात्र, यंदा झालेल्या महापालिका निवडणुकीत कलोती यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

# शेतकऱ्याने तक्रार केली म्हणून मारहाण!

## तालुका कृषी अधिकाऱ्याच्या मुजोरीविरोधात संताप

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** फळबागेच्या मस्टरचे प्रलंबित अनुदान न मिळाल्याने गोगरी (ता. मंगरूळपीर) येथील शेतकरी ऋषिकेश पवार यांनी काल जिल्हा कृषी कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने आज तालुका कृषी अधिकारी श्री. कांबळे हे गोगरी गावात आले असता, तक्रारीबाबत जाब विचारण्यासाठी गेलेल्या शेतकरी ऋषिकेश पवार यांना संबंधित अधिकाऱ्याने मारहाण केल्याचा अत्यंत गंभीर व धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे.

शेतकऱ्यांनी त्यांच्या हक्कासाठी आवाज उठवणे हा कोणताही गुन्हा नसून तो लोकशाहीतील मूलभूत अधिकार आहे. मात्र, तक्रारदार शेतकऱ्यावर हात उचलून दडपशाही व मुजोरी दाखवणाऱ्या अधिकाऱ्याच्या या कृत्यामुळे संपूर्ण शेतकरी समाजात तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या घटनेचा क्रांतिकारी शेतकरी संघटना, मेहकर तालुका यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला असून, संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यावर तात्काळ निलंबनासह कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्याची ठाम मागणी केली आहे. तसेच, पीडित शेतकरी ऋषिकेश पवार यांना तात्काळ न्याय व संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने मेहकर तहसीलदारांमार्फत मा. मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले असून, तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या व त्यांना मारहाण करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले, गणेश प्रकाश गारोळे, कैलास किसन उतपुरे, प्रविण दादाराव उतपुरे, सुरेश किसन खरात, भगवानराव लंबे उपस्थित होते.

